# लोकशाही शासनामध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता व आव्हाने :- तुलनात्मक अभ्यास [इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी सरकार]

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानवविद्याशाखाअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा**

**:: संशोधक ::**

पोले दिलीप गोविंदराव

**:: मार्गदर्शक :**

प्रा. डॉ. आयनेनिवार के.व्ही.

सरस्वती कला महाविद्यालय

किनवट

**:: अभ्यास केंद्र ::**

पीपल्स कॉलेज, नांदेड

**:: शैक्षणिक वर्ष ::**

2023

## प्रस्तावना :-

प्रौढ मताधिकाराच्या आधारे, खुल्या व निःपक्षपाती निवडणुकांद्वारा लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य म्हणजे लोकशाही होय. लोकशाही हा डिमॉक्रसी या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द आहे.. त्याची इंग्रजी व्युत्पत्तिकोशात डिमॉस (Demos) + क्रसी (Cracy) अशी फोड केली असून त्यांचा अनुक्रमे 'सामान्य लोक' व 'सत्ता' असा अर्थ दिला आहे. हा शब्द डिमॉस + क्रॅटोस (Demos + Kratos) या ग्रीक शब्दापासून झालेला असून त्याचे लॅटिन रूप डिमॉक्रॅशिया असे आढळते. या संज्ञेचा स्पष्ट अर्थ आणि संकल्पनेची काटेकोर व्याख्या, हे अद्यापि विद्वानांत विवाद्य विषय आहेत. अनेक आधुनिक विचारवंतांनी 'लोकशाही' या संकल्पनेची व्याख्या व फोड केलेली आहे. त्यापैकी अब्राहम लिंकन यांची 'लोकांनी केलेले, लोकांसाठी राज्य, लोकांकडून केलेले राज्य म्हणजे लोकशाही', ही व्याख्या लोकप्रिय व सुप्रसिद्ध आहे. लिंकन या संदर्भात पुढे म्हणतात, 'मला गुलाम म्हणून जसे जगण्यास आवडणार नाही, तद्वतच मालक म्हणून राहण्यास आवडणार नाही. माझ्या या उद्‌गारातूनच लोकशाहीची कल्पना व्यक्त होते.' 'बहुमतांचे राज्य' असेही लोकशाहीचे वर्णन केले जाते. लोकशाहीचे प्रत्यक्ष लोकशाही आणि अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार सामान्यतः मानले जातात. आधुनिक काळात 'लोकशाही' हा शब्दप्रयोग सामान्यपणे प्रातिनिधिक लोकशाही या अर्थानेच केला जातो तथापि स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोव देशांतून आजही साक्षात(प्रत्यक्ष) लोकशाहीचा प्रयोग काही प्रमाणात पाहावयास मिळतो. स्वित्झर्लंडमध्ये एकूण तीन हजार कम्यून असून सव्वीस कॅन्टन (घटक प्रदेश) आहेत. त्यांपैकी पाच घटक राज्यामध्ये वर्षातून काही दिवस सर्व नागरिक एकत्र जमतात. यावेळी सर्वच विधेयके चर्चेसाठी जनतेपुढे ठेवण्यात येतात आणि बहुमताने निर्णय घेतात. याशिवाय जनमतपृच्छा आणि उपक्रमाधिकार

या प्रकारांनी प्रत्यक्ष लोकशाहीची उपयोजना इतर कॅन्टनमध्ये करण्यात आली आहे. ही पद्धत ऑस्ट्रेलियाच्या संविधानातही नमूद केलेली आहे. परंतु तिचा प्रमुख्याने उपयोग संविधान दुरूस्तीच्या संदर्भातच करण्यात येतो.

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून-अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाल्या आणि आचारधर्म निर्माण झाले, त्यांपैकी लोकशाही ही एक आहे, म्हणून समाज आणि संस्कृती यांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर करणे अर्थपूर्ण ठरते. समाज व संस्कृती यांचे वळण जर लोकशाहीपर नसेल, तर लोकशाही पद्धतीचे संविधान स्वीकारूनही त्या देशात लोकशाही रूजणे व टिकणे अवघड जाते. याउलट, एखाद्या देशात लोकशाही पद्धतीने दीर्घकाळ राज्यकारभार चालू असता, त्या देशातील समाजाला व संस्कृतीला लोकशाही वळण प्राप्त होते. अशा प्रकारे या दोन्हींमधील परस्परसंबंध स्पष्ट करता येतो.

ब्रिटिश राजवटी पासून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. यामध्ये भारताने प्रतिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केलेला दिसून येतो. प्रतिनिधिक लोकशाहीलाच अप्रत्यक्ष लोकशाही असे देखील म्हटले जाते. यामध्ये लोकांनी काही प्रतिनिधींना निवडून पाठवलेले असते. निवडणूक प्रक्रिया घेण्यासाठी एका निवडणूक आयोगाची निर्मिती केली जाते. तो निवडणूक आयोग निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शकपणे व्हावे व योग्य त्या सर्व सदस्यांना मतदानाचा अधिकार मिळावा याची काळजी घेतो. निवडणूक प्रक्रियेमध्ये एक पक्ष किंवा एकापेक्षा जास्त पक्ष तसेच वैयक्तिक पातळीवर काही व्यक्ती (अपक्ष पद्धतीने) सहभाग घेत असतात. परंतु पक्षीय संघटन मजबूत आणि व्यापक असल्यामुळे कोणत्यातरी एका पक्षाची सत्ता येत असते किंवा दोन किंवा

अधिक पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापन करत असतात. जेव्हा एकाच पक्षाला एकूण जागे पैकी किमान 50% किंवा त्यापेक्षा जास्त जागा मिळाल्यास त्या पक्षाकडे स्पष्ट बहुमत आहे असे समजले जाते.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर सुकुमार सेन हे मुख्य निवडणूक आयुक्त असताना, त्याच्या कार्यकालामध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका 1952 पार पडल्या. या निवडणुकांमध्ये भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाचे सदस्य हे संसदेमध्ये बहुसंख्येने निवडून आले. 26 जानेवारी 1950 रोजी भारत हे प्रजासत्ताक राज्य बनले. या दिवशी भारताची सत्ता ही प्रजेच्या हातात आलेली होती परंतु भारताने अप्रत्यक्ष लोकशाही पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे भारतीय जनतेने त्यांचे प्रतिनिधी निवडून पाठवण्याचे ठरवले. 1950 ते 1952 या कालखंडामध्ये संविधान सभा हेच अंतरिम सरकार असेल असे ठरले होते. त्यामुळे अंतरिम सरकारमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू हे देशाचे पहिले पंतप्रधान बनले होते. 1952 ते 1964 या दरम्यान पंडित जवाहरलाल नेहरू हे देशाचे पंतप्रधान होते. त्यांच्या पक्षाकडे देशातील पहिले स्पष्ट बहुमताचे सरकार अस्तित्वात आले होते. त्यामुळेच नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताला अनेक समस्या असताना देखील भारतीय एकताच्या दृष्टिकोनातून व भारताच्या विकासाच्या दृष्टिकोनातून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. तसेच 2014 नंतर भारतीय जनता पक्ष (भा.ज.प.) याला देखील स्पष्ट बहुमत मिळालेले सरकार म्हणून  ओळखले जाते. त्यामुळे सदरील स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता व आव्हाने अभ्यासणे गरजेचे आहे.

## अभ्यास विषय व त्याचे महत्व

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारचा विचार केला असता आजपर्यंत फक्त दोन पंतप्रधानांचा कार्यकाळ हा स्पष्ट बहुमताचा दिसून येतो. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा कार्यकाळ व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यकाळ. एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर त्या पक्षाला निर्णय घेण्याची क्षमता वाढते. तसेच कार्यकाळ पूर्ण करण्याची व जनतेला दिलेल्या आश्वासनाकडे लक्षपूर्वक वेळ देण्याची संधी प्राप्त होते. त्यामुळे लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये स्पष्ट बहुमत मिळणे हे फायद्याचे ठरते. जसे देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे त्यांनी काही महत्वपूर्ण निर्णय घेतले, ज्यामधे देशांच्या नियोजनबद्ध विकासासाठी नियोजन आयोग स्थापन करने, परराष्ट्र धोरणात अलिप्तता, पंचशील करार असेल असे महत्वपूर्ण निर्णय घेणे शक्य झाले आहे.

भारतीय संविधान यामध्ये भारताने कल्याणकारी राज्याला प्रोत्साहन देणे अपेक्षित आहे. घटनेमध्ये हे राज्यकर्त्यांसाठी एक मार्गदर्शक तत्वच आहे. अश्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी स्पष्ट बहुमत असणे गरजेचे आहे. देशाची फाळणी झाल्यानंतर देशात अनेक ठिकाणी जातीय तेढ निर्माण करण्यात आले. त्यामध्ये सामान्य माणसाच्या आयुष्यात अनेक समस्या निर्माण झाल्या, त्यांना अनेक परिस्थितीला सामोरे जावे लागले. आशा परिस्तिथीमध्ये सर्व धर्मीय समान समजून, देशामध्ये धर्मनिरपेक्षतेला आणि एकता व एकात्मतेला प्राधान्य देणे असे महत्वपूर्ण भूमिका पंडीत जवाहरलाल नेहरु घेऊ शकले. स्वातंत्र्यानंतर देशात काही संस्थानिक हे अद्याप भारतात सामील झाले नव्हते. त्यामध्ये गोवा मुक्ती संग्राम, दमण दीव व दादरा नगर हवेली यांचे भारतात विलीनीकरण हे महत्वपूर्ण निर्णय घेता आले.

लोकशाही याचा शब्दश: अर्थ लोकांची सत्ता, असा आहे. लोकशाहीत राजकीय सत्ता ही एखाद्या व्यक्तीची किंवा गटाची मक्तेदारी नसते. राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी सर्व नागरिकांना असते. जनतेची इच्छा ही अंतिम आणि सर्वोच्च मानलेली असते. देशाचा कारभार लोकांच्या इच्छेला अनुसरून चालतो आणि राज्यकर्ते हे लोकांना जबाबदार असतात. प्राचीन ग्रीक विचारवंत हेरोडोटस् याने लोकशाहीची व्याख्या करताना म्हटले आहे की, “ज्या समाजात समान हक्क असतात आणि जिथे राज्यकर्ते आपल्या कृत्याबद्दल जबाबदार असतात, असा समाज म्हणजे लोकशाही समाज होय”.

अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी “लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून चालविलेले शासन’ असे वर्णन केलेले आहे. लोकशाही हे “लोकांचे शासन’ असणे म्हणजे लोकशाही शासनाबद्दल लोकांना जो जिव्हाळा असतो आणि त्याबद्दल लोकांमध्ये जी निष्ठा असते तशी दुसऱ्या कोणत्या शासनपद्धतीबद्दल असू शकत नाही. लोकशाहीत राजकीय प्रक्रियेत लोकांचा सहभाग असल्याने ते शासन आपले आहे, आपल्या इच्छेनुसार कार्य करणारे आहे, अशी लोकांची भावना असते. त्यामुळे लोकशाहीत शासनाच्या कार्याला लोकांचा जो प्रतिसाद आणि सहकार्य मिळते, तसे ते दुसऱ्या कोणत्या शासन पद्धतीत मिळू शकत नाही.

बहुमत हा राजकारणातला एक परवलीचा शब्द आहे. निवडणूक असो की कायदे मंडळात होणारे निर्णय असोत; इतकेच कशाला - अगदी न्यायालयीन निर्णय असोत; जिकडे बहुमत असेल ती बाजू जिंकली आणि ती बरोबरच आहे - असा आग्रह धरला जातो. पण हा जेवढा परवलीचा व सतत वापरला जाणारा शब्द आहे, तेवढाच तो गोंधळात टाकणारा आणि काही वेळा किचकट तात्त्विक प्रश्न निर्माण करणारा शब्द आह

आता हे तर खरेच आहे की निर्णय घेण्याची एक रीत म्हणून बहुमताने एखादी गोष्ट ठरवणे उपयुक्त आणि आवश्यक असते. दर वेळी प्रत्येक मुद्द्यावर सगळ्यांचे एकमत होणे अवघडच नाही, तर अशक्य असते. म्हणून मग शक्य तेवढ्या जास्त लोकांच्या संमतीने निर्णय घेण्याची पद्धत स्वीकारावी लागते. विशेषतः खूप मोठ्या संख्येने लोक असलेल्या समाजात ही पद्धत व्यवहारात जास्तच उपयुक्त ठरते.

निर्णय घेताना एकमत जरी झाले नाही, तरी सर्वांना मत मांडण्याचा अधिकार मोकळेपणाने वापरता आला तर आणि एकमत होऊ शकत नाही हे नक्की झाल्यावर, 'बहुमताने' निर्णय घेण्याची रीत लोकशाहीमध्ये स्वीकारली जाते. कारण, त्या पद्धतीत प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा आणि त्याचा पाठपुरावा करून इतरांना आपल्या बाजूने वळवण्याचा अधिकारही मान्य केलेला असतो. या अर्थाने बहुमत हा लोकशाहीच्या व्यवहारातला एक मध्यवर्ती मार्ग बनलेला दिसतो. लोकशाही म्हणजे काही केवळ बहुमताचे राज्य नव्हे; पण (एकमत होत नसेल तर) बहुमताशिवाय लोकशाहीची वाटचाल होऊ शकत नाही.

लोकशाही शासनव्यवस्थेचे दोन प्रमुख उपप्रकार म्हणजे अध्यक्षीय लोकशाही व संसदीय लोकशाही. ब्रिटिश राजवटीच्या माध्यमातून भारतीयांना आधुनिक संसदीय लोकशाहीचा परिचय झाला. संसदीय लोकशाहीची काही ठळक वैशिष्ट्ये असतात. पहिले म्हणजे, या व्यवस्थेत दोन प्रकारचे कार्यकारी प्रमुख असतात. नामधारी आणि वास्तव. भारतीय व्यवस्थेत या जबाबदाऱ्या अनुक्रमे राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्याकडे दिल्या गेल्या आहेत. नामधारी प्रमुख देशाचा, तर वास्तव प्रमुख सरकारचा प्रमुख म्हणून कार्य करतात. (भारतीय राज्य घटनेतील कलम ७४) संसदीय व्यवस्थेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सामूहिक उत्तरदायित्व. मंत्रिमंडळ हे सामूहिकरित्या संसदेला जबाबदार असते. (भारतीय राज्य घटनेतील कलम ७५)

कारण आधी संसदेची निवडणूक होते. त्यामध्ये बहुमत मिळवणाऱ्या पक्षाला सरकार स्थापन करण्याचे आमंत्रण राष्ट्रपती देतात. प्रत्येक मंत्री हा संसदेचा सदस्य असतो. संसदेत बहुमत असेपर्यंत सरकारला कार्यरत राहता येते. मात्र, संसदेतील बहुमत गमावल्यास सरकारला राजीनामा देणे भाग पडते. भारताच्या राज्य घटनाकारांनी अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा संसदीय लोकशाहीचा पर्याय निवडला. सरकारचे तीन स्तंभ म्हणजे कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ आणि न्याय मंडळ. संसदीय लोकशाही या नावावरून हे स्पष्ट होते की या व्यवस्थेमध्ये संसद म्हणजे कायदेमंडळ श्रेष्ठ ठरवण्यात आले आहे. भारतीय संसदेची रचना, कार्ये, विविध प्रक्रिया, अधिकारी वर्ग, सदस्यांचे विशेषाधिकार अशा विविध पैलूंची स्पष्टता राज्यघटनेच्या विभाग पाच मधील कलम ७९ ते १२२ मध्ये करण्यात आली आहे. तर घटनेच्या विभाग सहा मध्ये कलम १६८ ते २१२ मध्ये राज्य विधिमंडळाविषयी विवेचन केलेले आहे. केंद्र आणि राज्य या दोन्ही ठिकाणी भारतीय राज्य घटनेने लोकशाही पद्धतीचा अवलंब केलेला दिसून येतो. त्यामुळे लोकशाहीतील स्पष्टबहुमताच्या सरकारचे फायदे समजून घेण्यासाठी आणि त्यांच्यासमोर निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्यासठी **“लोकशाही शासनामध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता व आव्हाने:- तुलनात्मक अभ्यास (इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी सरकार)”** हा विषय संशोधन करण्यासठी निवडण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे:

विषयानुरूप संशोधनाचा हेतू साध्य करण्यासाठी आणि संशोधन अभ्यासाला योग्य दिशा  देण्यासाठी संशोधन अभ्यासाची काही उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहेत. ती संशोधन उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

1- लोकशाही शासन व्यवस्था समजून घेणे.
2- लोकशाही शासन व्यवस्थेतील मानवी विकासाच्या दृष्टीने महत्त्व जाणून घेणे.
3- लोकशाही शासन व्यवस्थेमधील पक्षीय राजकारणाची भूमिका समजून घेणे.
4- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता जाणून घेणे.
5- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकार समोरील निर्माण होणारी आव्हाने समजून घेणे.

**संशोधनाची गृहितके:**

1- अप्रत्यक्ष लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये पक्षीय राजकारणाची भूमिका महत्त्वाची आहे.
2- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारचे महत्व अनन्यसाधारण आहे.
3- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये लोकांची भूमिका अत्यंत महत्त्वाचे ठरते.
4- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारला निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते.
5- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनता महत्त्वाची असल्यामुळे सरकार समोर कधीकधी आव्हाने निर्माण होतात.

6- लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सर्वात महत्त्वाचे मतदार लोक अत्यंत महत्त्वाचे आहेत.

## संशोधनाची व्याप्ती:

लोकशाही शासनामध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता व आव्हाने एक विश्लेषणात्मक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आलेला आहे. या विषयानुरूप संशोधनाच्या व्याप्तीमध्ये लोकशाही शासन व्यवस्था, पक्षीय राजकारण, स्पष्ट बहुमताचे सरकार, त्यांची उपयुक्तता व त्यांना निर्माण होणारे आव्हाने ही संशोधन विषयाची व्याप्ती आहे.

## संशोधनाच्या मर्यादा:

संशोधन करीत असताना विषयाचे अंतिम उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एका आदर्श संशोधकाला घातलेल्या संशोधन मर्यादा या फायदेशीर ठरत असतात. कारण संशोधनासाठी उपलब्ध असलेल्या वेळ, श्रम व पैसा या सर्व बाबींचा त्यांच्या संशोधनावर परिणाम होत असतो. या संपूर्ण बाबीचा विचार करून प्रस्तुत संशोधन हे केवळ लोकशाही शासन व्यवस्थेमधील स्पष्ट बहुमताच्या सरकार विषयी मर्यादित करण्यात आलेले आहे. या मध्ये इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी यांचे सरकार यांच्या विषयी मर्यादित केले आहे.

## संशोधन पद्धती:

संशोधनाची कार्यपद्धती निश्चित करताना अनेक वर्षांचा विचार करून कार्यपद्धती ठरवावी लागते. संशोधन करीत असतांना अनेक साधनांचा उपयोग केला जातो. त्या साधनांची निश्चिती करणे, अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे संशोधन पद्धती निवडीसाठी उपयुक्त विचार करूनच कार्यपद्धती निवडण्यात येते.

संशोधनात वापरला जाणारा संशोधन पद्धती, साधने इत्यादी बाबी हा तात्विक भाग विचारात घेऊन निश्चित करण्यात येतात. याचे मुख्य कारण असे की कोणत्याही कामातील उद्योग समजून घेण्यासाठी त्यामागील तात्विक भागामुळे त्या साधनांचे व संशोधन पद्धतीचे संशोधनासाठी असणारे महत्त्व काय? हे समजण्यास मदत होते. तसेच संशोधनासाठी प्रत्यक्ष पद्धती कशाप्रकारे राबविणार, त्या मागची उद्दिष्टे कोणती आहेत, याचे आकलन होते. कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असताना विविध संशोधन पद्धतीचा वापर केला जातो संशोधनासाठी खालील पद्धती वापरल्या जातात.

1- ऐतिहासिक संशोधन पद्धती

2- वर्णनात्मक संशोधन पद्धती

3- प्रायोगिक संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात **“लोकशाही शासनामध्ये स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता व आव्हाने:- तुलनात्मक अभ्यास (इंदिरा गांधी व नरेंद्र मोदी सरकार)”** या समस्येचे संशोधन करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा तसेच ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. विश्लेषण पद्धतीचा देखील वापर केला जाणार आहे.

**प्रकरण योजना**

## प्रकरण पहिले:- प्रस्तावना

सदरील प्रकरण हे प्रस्तावनेचे असून यामध्ये संशोधनाची गरज व महत्त्व, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची परिकल्पना, संशोधनाची व्याप्ती, व संशोधनाची मर्यादा इत्यादी घटकाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## प्रकरण दुसरे:- संबंधित साहित्याचा आढावा

सदरील प्रकरणांमध्ये संशोधन समस्यांशी निगडित साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे त्यामध्ये पूर्व संशोधनाचा आढावा संबंधित ग्रंथ वर्तमानपत्रे व नियतकालिकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

## प्रकरण तिसरे:- संशोधनाची कार्यपद्धती

सदरील प्रकरणांमध्ये संशोधन म्हणजे काय, संशोधनाच्या व्याख्या, संशोधनाच्या पद्धती, प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली संशोधन पद्धती, संशोधन साधने, साधनांची निर्मिती व प्रत्यक्ष कार्यवाही इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## प्रकरण चौथे:- माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

सदरील प्रकरणांमध्ये लोकशाही शासन व्यवस्थेमधील स्पष्ट बहुमताच्या सरकारची उपयुक्तता व आव्हाने या संबंधी जी माहिती प्राप्त होईल तिची विश्लेषण करून त्यातून अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

## प्रकरण पाचवे:- सारांश निष्कर्ष व शिफारशी

सदरील प्रकरणांमध्ये प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे संशोधनांचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी यांची माहिती दिली जाणार आहे तसेच पुढील संशोधनासाठी नवीन विषय सुचिवण्यात येणार आहे.

## संदर्भ ग्रंथसूची:-


1- भारतीय लोकशाहीचा इतिहास भ्रम आणि वास्तव - लक्ष्मण बाबुराव शिंदे

2- इंडियन पॉलिटी एम लक्ष्मीकांत के सागर प्रकाशन ऑक्ट २०२१

3- शैक्षणिक संशोधन पद्धती, डॉ.वी.रा.भिंताडे, नूतन प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती 2007.

4- शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, मुळे व उमाटे, विद्या प्रकाशन औरंगाबाद, द्वितीयावृती 2010.

5- संशोधन पद्धती, डॉ. डी. सी. सावंत व डॉ. रवी एन. सरोदे, ईगल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, 7 ऑक्टोबर 2021.

6- भारताची राज्यघटना आणि प्रशासन, श्री रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2013-14.

7- शिक्षणातील संशोधन, (संख्यात्मक आणि गुणात्मक), प्रा. बन्सी बिहारी पंडित, नित्य नुतन, प्रकाशन पुणे, एप्रिल 2007

8- भारतीय संविधान - बी.सुभाष कश्यप

9- भारतीय लोकशाहीचे भवितव्य आणि युवक. संपादक- डॉ. गोकुळ मुंडे

10- लोकशाही, निवडणूक आणि शुशासन - संपादक प्रा. डॉ. भारती पाटील

11- भारतीय उपखंडातील वैशिष्टपूर्ण लोकशाहीचा शोध, लोकशाही जिंदाबाद - प्रमुख संशोधक- योगेंद्र यादव, सुहास पलशीकर, पीटर डिसुझा. अनुवाद: मनोहर सोनवणे

| **संशोधक** | **मार्गदर्शक** |
|---|---|
| दिलीप गोविंदराव पोले | प्रा. डॉ. आयनेनीवार के.व्ही. |